सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ

क्रमांक :- रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.३०/ का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०१ /१०/२०२५

प्रति,
१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. जिल्हाधिकारी (सर्व)
(मुंबई शहर, मुंबई उपनगर, भंडारा व गोंदिया वगळून)

विषय :- राज्यातील ३२ जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका - आरक्षण सोडत कार्यक्रम.

संदर्भ :-१) मा. सर्वोच्च न्यायालयाने दाखल पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपिल (सी) क्र. १९७५६/२०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.०६/०५/२०२५ व दि.१६/०९/२०२५ रोजी दिलेले आदेश

२) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग यांचेकडील क्र. जिपनि-२०२५/प्र.क्र.३६/पं.रा.-२, दि.१२/० ६/२०२५ चे आदेश व अधिसूचना दि.१८/०८/२०२५ रोजीचे पत्र

३) राज्य निवडणूक आयोगाची अधिसूचना क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२५/ प्र.क्र. /का.७, दि.१८/०६/२०२५

४) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग यांचेकडील अधिसूचना क्र.जिपनि-२०२५/प्र.क्र.९७/पं.रा.२, दि. २० ऑगस्ट, २०२५

५) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२५/ प्र.क्र.२९/का.७, दि.०१/१०/२०२५

महोदय/महोदया,

मा. सर्वोच्च न्यायालयाचा संदर्भाकित अ.क्र.१ समोरील दि.०६/०५/२०२५ रोजीचे आदेश व महाराष्ट्र अधिनियम क्र.२२, दि.११/०३/२०२२ अनुसार राज्यातील ३२ जिल्हा परिषदा व ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी ग्राम विकास विभागाकडील संदर्भाकित अ.क्र. २ समोरील दि.१२/०६/२०२५ रोजीच्या आदेशान्वये सर्व संबंधित ३२ जिल्हा परिषदेची सदस्य संख्या निश्चित करण्यात आली असून संबंधित ३२ जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ३३६ पंचायत समित्यांच्या प्रभाग रचनेचा कार्यक्रम देण्यात आला. सदर प्रभाग रचना कार्यक्रमानुसार संबंधित जिल्हा कार्यालयाकडून जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत पंचायत समित्यांची अंतिम प्रभाग रचना दि.२२/०८/२०२५ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. आता या पत्राद्वारे राज्यातील ३२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता सदस्यांचे आरक्षण निश्चित करण्याबाबतचा कार्यक्रम सोबतच्या प्रपत्र-१ मध्ये देण्यात येत आहे. तसेच संदर्भीय अ.क्र.५ समोरील दि.०१/१०/२०२५ रोजीच्या आदेशान्वये जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमधील सदस्यांचे आरक्षण निश्चितीबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. (प्रत संलग्न) सदर आदेशातील सूचना तसेच आरक्षण निश्चित करण्याबाबतच्या कार्यक्रमानुसार सर्व संबंधित जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांनी विहित कालावधीत आरक्षण अंतिम करण्याबाबतची कार्यवाही करावी.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

सोबत:- प्रपत्र-१

०१.१०.२०२५

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-

१) प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई -४०० ००१
२) मा. सर्वोच्च न्यायालय व मा. मुंबई उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे पॅनलवरील सर्व वकील
३) राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
४) निवड नस्ती (कार्यासन-७), राज्य निवडणूक आयोग

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.३०/का.७, दि.०१/१०/२०२५ सोबतचे सहपत्र)

प्रपत्र-१

## राज्यातील ३२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका

## सदस्य आरक्षण निश्चिती / सोडतीचा कार्यक्रम

| अ.क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारुप आरक्षण** | | |
| १ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता जागा निश्चित करण्यासाठी विहित नमुन्यातील प्रस्ताव तयार करुन विभागीय आयुक्त यांच्याकडे सादर करणे. | जिल्हाधिकारी | ०६/१०/२०२५ पर्यंत |
| २ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता राखीव जागांच्या प्रस्तावास मान्यता देणे. | विभागीय आयुक्त | ०८/१०/२०२५ पर्यंत |
| ३ | आरक्षण सोडतीची सूचना वृत्तपत्रात प्रसिध्द करणे {नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील व सर्वसाधारण महिलांसह) बाबत} | जिल्हाधिकारी | १०/१०/२०२५ |
| ४ | आरक्षणाची सोडत काढणे<br>नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील व सर्वसाधारण महिलांसह) बाबत} | | |
| | आ) जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी | जिल्हाधिकारी | १३/१०/२०२५ |
| | ब) पंचायत समिती निर्वाचक गणासाठी | तहसिलदार | |
| ५ | प्रारुप आरक्षणाची अधिसूचना प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | १४/१०/२०२५ |
| | **ब) हरकती व सूचना** | | |
| ६ | जिल्हाधिकारी यांच्याकडे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील प्रारुप आरक्षणावर हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी | - | १४/१०/२०२५ ते १७/१०/२०२५ |
| ७ | प्राप्त प्रारुप आरक्षणावरील हरकती व सूचना आधारे अभिप्रायासह गोषवारा विभागीय आयुक्त यांना सादर करणे | जिल्हाधिकारी | २७/१०/२०२५ पर्यंत |
| ८ | प्रारूप आरक्षणावर प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करुन आरक्षण अंतिम करणे | विभागीय आयुक्त | ३१/१०/२०२५ पर्यंत |
| | **क) अंतिम आरक्षण** | | |
| ९ | अंतिम आरक्षण शासन राजपत्रात प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | ०३/११/२०२५ पर्यंत |

टिप :- विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील नोडल ऑफीसर यांनी प्रत्येक टप्प्यावरील कामकाजाबाबत आयोगास अहवाल सादर करावा.

01.10.2025

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र